खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र १

## विषय

## सहकारः सिद्धांत आणि कार्यपद्धती

# प्रकरण ३

# भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील सहकारी चळवळीचा विकास

# प्रकरण 3

# भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील सहकारी चळवळीचा विकास

## प्रस्तावना

या प्रकरणामध्ये आपण भारताच्या स्वातंत्र्यानंतर सहकार चळवळीमध्ये विविध व्यक्तींचे योगदान म्हणजेच वैकुंठभाई मेहता, डॉ धनंजय गाडगीळ , पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखेपाटील, डॉ. वर्गिस कुरियन आणि कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे सहकार क्षेत्रातील योगदान याबाबदल अभ्यास करणार आहोत . तसेच गोरवाला समिती आणि वैद्यनाथन समिती चा अहवालाचा देखील अभ्यास करणार आहोत. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास आणि भारतातील सहकारी चळवळीची सद्यस्थिती याचादेखील आढावा आपण या प्रकरणात घेणार आहोत.

## भारताच्या स्वातंत्र्यानंतर सहकार चळवळीमध्ये विविध व्यक्तींचे योगदान

1) पद्मश्री वैकुंठभाई मेहता यांचे सहकार क्षेत्रातील योगदान( 1891-1964)
2) डॉ धनंजय गाडगीळ यांचे सहकार क्षेत्रातील योगदान (1901-1971)
3) पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखेपाटील यांचे सहकार क्षेत्रातील योगदान (१८९७ -1980)
४) कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे सहकार क्षेत्रातील योगदान (1905-1961)
५) डॉ. वर्गिस कुरियन यांचे सहकार क्षेत्रातील योगदान (1921-2012)

## 1) पद्मश्री वैकुंठभाई मेहता यांचे सहकारी चळवळीतील योगदान (1891-1964)

### 1)परिचय

पद्मश्री वैकुंठभाई मेहता यांचा जन्म २३ ऑक्टोबर, १८९१ रोजी अहमदाबाद येथे झाला. त्यांचे शिक्षण मुंबई येथील न्यू हायस्कूल या शाळेतून झाले. त्यांनी आपले कॉलेज शिक्षण एलफिन्स्टन कॉलेज मुंबई येथून पूर्ण केले. त्यांचा मृत्यू २७ ऑक्टोबर १९६४ राजी झाला.

### २) सहकार आणि वैकुंठभाई मेहता

वैकुंठभाई मेहता यांना त्यांच्या वडिलांप्रमाणेच सहकार चळवळींमध्ये रस होता. त्यांनी बॉम्बे स्टेट कोऑपरेटिव्ह मध्ये ३४ वर्षे सेवा केली आणि मुंबई राज्यातील ग्रामीण पुनर्बांधणी कामांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. १९४७ मध्ये खेर मंत्रिमंडळात त्यांची वित्त आणि सहकार मंत्री म्हणून नेमणूक झाली. १९५३ मध्ये त्यांची अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली होती. ते १९२९ ची बँकिंग चौकशी समिती, १९४० व १९५३ ची वस्त्रोद्योग चौकशी समिती इत्यादींचे ते सदस्य होते. १९५९ च्या शेतकी सहकारी पतपुरवठा आयोगाचे ते अध्यक्ष होते. १९५४ मध्ये त्यांना पद्मभूषण या किताबाने गौरविण्यात आले.

**३) प्रसिद्ध पुस्तके**

वैकुंठभाई मेहता यांनी सहकार चळवळ आणि ग्रामोद्योग यावर अनेक पुस्तके लिहिली. त्यापैकी काही पुस्तके खालीलप्रमाणे :

१) सहकारी चळवळ (१९१५)
२) भारतातील सहकारी चळवळ (१९१८)
३) सहकार पतपुरवठ्याचा अभ्यास (१९२७)
४) सहकार चळवळीसाठी नियोजन (१९४१)
५) ग्रामोद्योगाची आवश्यकता (१९६३)
६) अहिंसेचे अर्थशास्त्र (१९६३)
७) विकेंद्रित आर्थिक विकास (१९६३)

**४) सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणातील योगदान**

वैकुंठभाई मेहता यांचे सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण यातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या मते, सहकार प्रशिक्षण ही केवळ एक अत्यावश्यक बाबच नव्हे तर सहकार कार्यक्रमातील एक चिरस्थायी अशी अट आहे. वैकुंठभाई मेहता एक सहकार चळवळीचे सच्चे शिल्पकार, विचारवंत आणि प्रतिभावंत लेखक होते. त्यांनी प्रवरानगर येथील आशियातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांना सक्रिय आणि मोलाची मदत केली. त्यांच्या सहकार चळवळीतील महत्त्वपूर्ण योगदानामुळे देशातील राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण संस्थेला डॉ. वैकुंठभाई मेहता यांचे नाव देण्यात आलेले आहे.

## <u>2) डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे सहकारी चळवळीतील योगदान (1901-1971)</u>

**1) परिचय**

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचा जन्म १० एप्रिल, १९०१ रोजी नागपूर येथे झाला. महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या विकासातील त्यांचे योगदान लक्षणीय आहे. ते एक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ होते. महाराष्ट्रातील प्रवरानगर येथे भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यासाठी त्यांनी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांना सक्रिय साहाय्य केले. या कारखान्याचे ते पहिले अध्यक्ष होते. त्यांचा मृत्यू ३ मे १९७१ रोजी झाला.

**2) गोखले इन्स्टिट्यूटची स्थापना**

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी पुणे येथे ग्रामीण अर्थव्यवस्था, ग्रामीण लोकांची बलस्थाने आणि दुर्बलस्थाने, त्यांच्या चिंता आणि अपेक्षा इत्यादी समजून घेण्याच्या दृष्टीने संशोधन करण्यासाठी महाराष्ट्रात पुणे येथे गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकानॉमिक्स या संस्थेची स्थापना केली. आपल्या १९३० ते १९३३ या संचालक पदाच्या कालावधीमध्ये त्यांनी विविध मूलभूत संशोधन

प्रकल्प हाती घेतले आणि पूर्ण केले. त्यांनी सहकार क्षेत्राचा विकास करण्यासाठी संशोधन, प्रयोग आणि अनुभव यांची सांगड घातली. त्यांचे सहकारी पतपुरवठा संस्थांमधील योगदान लक्षणीय आहे.

**३) ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती**

डॉ. धनंजयराव गाडगीळ हे भारतीय रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीचे सदस्य होते. ते १९५२ ते १९६२ या कालावधीमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक होते. त्याचप्रमाणे १९६७ ते १९७१ या काळात ते नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होते.

## 3) पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे सहकारी चळवळीतील योगदान

**1) परिचय**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९७ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील लोणी या एका खेड्यात झाला. ब्रिटिश राजवटीत गरीब शेतकरी लोकांना शिक्षणाची सुविधा नव्हती. यो लिक डॉ. विखे पाटील हे एका गरीब शेतकरी कुटुंबातील असल्याने त्यांना फारसे शिक्षण घेता आले नाही व त्यांना आपला शेती व्यवसाय स्वीकारावा लागला. त्या काळामध्ये शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय नाश होत होती. त्यांचा मृत्यू २७ एप्रिल १९८० रोजी झाला.

**२) सहकारी पतपेढीची स्थापना**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी १९२३ मध्ये लोणी येथे लोणी बुद्रुक सहकारी पतपेढी' (सहकारी पतसंस्था) सुरू केली. सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली आशियातील पहिली वित्तीय संस्था म्हणून या संस्थेकडे पाहिले जाते. त्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करण्यासाठी खेडोपाडी अनेक सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना केली.

**३) विविध सहकारी संस्थांची स्थापना**

वरील प्रमाणे खेडोपाडी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन केल्यानंतर डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी १९२९ मध्ये राजुरी या खेड्यात भटक्या जमातीसाठी एका सहकारी संस्थेची स्थापना केली. त्याचप्रमाणे त्यांनी गोदावरी प्रवरा कॅनल ट्रेड सोसायटीची स्थापना केली. १९४४ मध्ये त्यांनी सहकारी तत्त्वावर आधारित शेती सहकारी संस्थेची स्थापना केली.

**४) सहकारी साखर कारखान्याची स्थापना**

त्यावेळचा शेतकरी हा जमीनदार आणि सावकार यांच्या पाशात अडकलेला होता. सर्व परिस्थिती लक्षात घेऊन सहकारी साखर कारखान्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांना डॉ. धनंजयराव गाडगीळ, गोपाळकृष्ण गोखले, वैकुंठभाई मेहता आणि इतरांनी साहाय्य केले आणि

१९४८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे आशियातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यात आला. १९५० साली प्रत्यक्ष साखर उत्पादनास सुरुवात झाली. हा कारखाना उभारण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.हा कारखाना उभारण्याच्या कामी प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ यांचे मोलाचे साहाय्य लाभले. गाडगीळ हे या सहकारी साखर कारखान्याचे पहिले अध्यक्ष होत.

**५) डॉ. विखे पाटील यांच्या प्रोत्साहनाने इतर अनेक सहकारी संस्थांची स्थापना**

या सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेनंतर त्यापासून प्रेरणा घेऊन अनेक सहकारी कारखाने आणि संस्था स्थापन झाल्या. या कारखान्यांनी केवळ शेतकऱ्यांनाच फायदा झाला नाही तर इतर उद्योगांची स्थापना होऊन त्या परिसराचा कायापालट झाला आणि सहकारी तत्त्वावर अनेक संस्था आणि कारखाने अस्तित्वात आले.

**६) पदव्या आणि सन्मान**

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सहकार चळवळीतील व इतर कार्यांसाठी त्यांना सहकार महर्षी ही पदवी बहाल करण्यात आली आहे. १९६२ साली त्यांना पद्मश्री या किताबाने सन्मानित करण्यात आले. पुणे विद्यापीठाने त्यांना डि.लिट ही पदवी बहाल केली तर महात्मा फुले कृषी विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी बहाल केली.

**७) इतर कामे**

त्यांनी १९६४ मध्ये प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. ऑगस्ट १९६४ मध्ये त्यांनी प्रवरा पब्लिक स्कूलची तर १९६९ मध्ये प्रवरा कन्या विद्या मंदिराची स्थापना केली. १९७१ मध्ये पद्मश्री विखे पाटील कला, सायन्स आणि वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. या संस्थांनी शाळा आणि महाविद्यालयीन शिक्षण खेड्यातील मुलामुलींपर्यंत आणले. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील हे खऱ्या अर्थाने सहकार महर्षी होत.

## <u>4) कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे सहकार चळवळीतील योगदान (1905-1961)</u>

**1) परिचय**

कर्मवीर भाऊसाहेब हिरे हे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सहकारी क्षेत्रातील एक दैदिप्यमान व्यक्तिमत्त्व होय. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचा जन्म १ मार्च १९०५ रोजी नाशिक येथे झाला. महाराष्ट्राला संत, योगी, देशभक्त आणि महान सामाजिक सुधारक यांची भूमी म्हणून संबोधले जाते. भाऊराव हिरे हे त्यातीलच एक. त्यांचा समाजसेवेवर गाढ विश्वास होता आणि म्हणूनच त्यांना कर्मवीर असे संबोधले जाते. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचा मृत्यू ६ नोव्हेंबर १९६१ रोजी झाला.

**2) योगदान**

सहकाराशिवाय विकास होणे शक्य नाही हेही त्यांना समजून चुकले होते आणि म्हणूनच त्यांनी सहकार चळवळीत भाग घेतला आणि अनेक बँका, सहकारी पतसंस्था आणि सहकारी विकास मंडळांची स्थापना झाली.

भाऊसाहेब हिरे हे गांधीजी, विनोबाजी आणि जवाहरलाल नेहरू यांचे अनुयायी होते. त्यांनी सत्याग्रहामध्ये भाग घेतला होता. महाराष्ट्रातील मालेगाव येथे त्यांनी साक्षरता मोहीम सुरू केली. त्यांनी सौंदाने येथे भटक्या जमातीसाठी बोर्डिंगची सुविधा असणारी पहिली शाळा सुरू केली. तळागाळातील लोकांना वर आणणे केवळ शिक्षणामुळे शक्य होईल याची त्यांना खात्री पटली होती. त्यांनी अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना केली.

भाऊसाहेब हिरे यांनी तालुका पातळीवर विपणन संघ स्थापन केला आणि जिल्हा पातळीवर अशा संस्थाचा संघ निर्माण केला. १९५६ मध्ये त्यांनी नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना केली. सहकार क्षेत्रातील त्यांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे १९५६ मध्ये दाभाडी येथे स्थापन केलेला गिरणा सहकारी साखर कारखान्याची स्थापना होय.

## 5) डॉ. वर्गिस कुरियन यांचे सहकार क्षेत्रातील योगदान (1921-2012)

**1) परिचय**

भारताच्या सहकारी चळवळीच्या विकासामध्ये अनेकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यापैकी एक महत्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. वर्गीस कुरियन हे होत. दूध उत्पादनामध्ये सहकारी तत्त्वाचा वापर करणारे ते एक महान सहकारी नेते होत, भारतात धवल क्रांतीचा मान त्यांना दिला जातो. डॉ वर्गिस कुरियन यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९२१ रोजी झाला आणि त्यांचा मृत्यू ९ सप्टेंबर २०१२ रोजी झाला .

**2) वर्गीस कुरियन आणि अमूल**

सरकारने वर्गीस कुरियन यांना दिलेल्या शैक्षणिक स्कॉलरशीपसाठीचा करार कालावधी पूर्ण करण्यासाठी ११ मे, १९४९ रोजी गुजरातमधील आनंद येथे आले. डॉ. वर्गीस कुरियन यांनी श्री त्रिभुवनदास पटेल यांच्याबरोबर खेडा जिल्ह्यामध्ये सहकारी संस्था विकसित करण्यास सुरुवात केली. या सहकारी संस्थेचे काम होते शेतकऱ्यांकडून दूध गोळा करणे आणि त्यांना त्यांच्या दुधाच्या दर्जानुसार दुधाची रक्कम अदा करणे. श्री. कुरियन हे सर्वांना उच्चारता येईल आणि संघाच्या वृद्धीसाठी मदतपूर्ण ठरेल अशा नावाच्या शोधात होते.दर्जा नियंत्रण अधिकाऱ्याने अमूल्य हे नाव सुचविले. हा शब्द संस्कृत भाषेतून घेतलेला असून त्याचा अर्थ होतो अनमोल. नंतर हे नाव

संघाला त्यांचा भाग बनविण्यासाठी अमूल असे करण्यात आले म्हणजेच आनंद मिल्क युनियन लिमिटेड [Anand Milk Union Ltd. (AMUL)]

**३) सहकारी मॉडेलची निर्मिती**

अमूलने खेड्यांच्या समूहांसाठी अनेक सहकारी संस्था स्थापन केल्या. या सहकारी संस्थांचे काम होते खेड्यातील शेतकऱ्यांकडून दिवसातून दोनदा दूध संकलित करणे. दुधातील फॅटनुसार शेतकऱ्यांना दुधाचा मोबदला दिला जात असे. यामध्ये गैरप्रकार होऊ नयेत आणि एकूण प्रक्रियेची कार्यक्षमता वाढावी म्हणून फॅट मोजणीचे यंत्र, अचानक पर्यवेक्षण, शेतकरी शिक्षण इत्यादी सारखी पावले उचलली गेली.श्री. कुरियन आणि श्री. पटेल यांनी विपणन मार्ग स्वतः आखले होते. ज्यामुळे सहकारी यंत्रणा सुरळीत चालून तिचा विकास होत होता. १९६० च्या अखेरीस अमूल उद्योग यशाचे एक उदाहरण बनले.

**४) ऑपरेशन फ्लड-धवल क्रांती**

१९६४ मध्ये पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना अमूल मधील एका प्लॅण्टचे उद्घाटन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. लालबहादूर शास्त्रींनी डॉ. कुरियन यांच्या बरोबर जवळजवळ सर्वच सहकारी संस्थांना भेटी दिल्या. दिल्लीला परतल्यानंतर त्यांनी आनंदच्या धर्तीवरच संपूर्ण जगात दूध प्रकल्प राबविण्यास सांगितले. या प्रयत्नातूनच १९६५ साली राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाची निर्मिती झाली. १९६९ मध्ये जागतिक बँकेचे अध्यक्ष भारतीय दौऱ्यावर आले. जागतिक बँकेने कोणतीही अट न घालता कर्ज मंजूर केले.श्री. कुरियन यांनी दुधावर प्रक्रिया करून दुध पावडर आणि इतर अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती सुरु केली. १९७३ मध्ये त्यांनी गुजरात सहकारी दुग्ध विपणन संघाची स्थापना केली आणि त्यामार्फत देशभरात तसेच परदेशात दूध आणि दुधाच्या पदार्थांचे विपणन सुरू केले.

**५) ग्रामीण व्यवस्थापन संस्थेची स्थापना**

डॉ. कुरियन यांचे सहकार चळवळीतील आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे आनंद येथील ग्रामीण व्यवस्थापन संस्थेची स्थापना हे होय. या संस्थेमार्फत प्रशिक्षण देवून ग्रामीण उद्योगांची देखभाल करण्यासाठी प्रशिक्षित आणि पात्र व्यवस्थापक पुरविण्याची व्यवस्था करण्यात येते. ग्रामीण सहकारी संस्थांचे व्यावसायिकीकरण करण्यासाठी केलेला देशातील हा पहिलाच प्रयत्न ठरला. वरील सर्व बाबींचा विचार केल्यास केवळ एक व्यक्ती एका घरगुती व्यवसायाचे एका मोठ्या दुग्ध उत्पादन संस्थेत रूपांतर करू शकतो यावर विश्वास ठेवणे कठीण जाते.

# डॉ. गोरवाला समितीचा अहवाल 1954

# किंवा

# अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती

**प्रस्तावना**

पतपुरवठाविषयक स्थितीची पाहणी करून या क्षेत्रातील समस्यांबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत शिफारशी करण्यासाठी १९५१ साली डॉ. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीची नियुक्ती करण्यात आली. या स्थितीची पाहणी करून १९५४ साली आपला अहवाल सादर केला.

**अ) गोरवाला समितीने स्पष्ट केलेली सहकारी चळवळीच्या अपयशाची कारणे :**

१) अपुरा प्रसार :

भारतातील सहकारी चळवळीचा सर्वत्र प्रसार झाला नव्हता. विशेषतः ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आलेली नव्हती त्यामुळे सहकारी चळवळ समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचली नाही.

२) ग्रामीण जनतेची उदासिनता व अल्प सहभाग :

भारतात सहकारी चळवळीस पन्नास वर्षे होऊनही जनतेमध्ये विशेषत: ग्रामीण जनतेमध्ये या चळवळीबाबत उदासिनता दिसून आली त्यामुळे या लोकांचा सहकारी संस्थामधील सहभाग अत्यल्प होता. समाजातील शेतकरी, शेतमजूर, महिला व मागासवर्गीय लोक या चळवळीपासून दूरच होते.

३) कर्जपुरवठ्यातील असमर्थता :

ग्रामीण कर्जबाजारीपणा दूर करणे हे भारतीय सहकारी चळवळीचे उद्दिष्ट होते; परंतु सर्वसामान्य शेतकरी व समाजातील दुर्बल घटकांना कर्जपुरवठा करण्यात या संस्थांना पुरेसे यश आले नाही त्यामुळे ग्रामीण भागात ही चळवळ अपयशी ठरली.

४) गटबाजी :

भारतीय सहकारी संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर गटबाजी, वशिलेबाजी असे प्रकार चालतात, समितीला आढळले. या गटबाजीमागे राजकारणाचा सहकारामध्ये झालेला प्रवेश हे एक कारण असल्याचेही आढळून आले.

५) अकार्यक्षम कर्मचारीवर्ग

या संस्थांचा कर्मचारीवर्ग पुरेसे शिक्षित नव्हते तसेच त्यांना सहकाराचे प्रशिक्षणही देण्यात आलेले नव्हते त्यामुळे या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता कमी होती. याचा विपरीत परिणाम या संस्थांच्या कारभारावर होत होता.

६) नियमबाह्य वर्तन :

या समितीला सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे वर्तनही नियमबाह्य असल्याचे आढळले. हे लोक संस्थेच्या पैशाचा वापर आपल्या कामांसाठी करत. तसेच त्यात पैशातून खासगी सावकारीसारखे व्यवसायही हे लोक करत.

७) अयोग्य कार्यपद्धती :

या संस्थांची कार्यपद्धती अयोग्य स्वरूपाची होती. कर्जवाटपाबाबत सर्वसामान्य सभासदांसाठी कठोर नियम व प्रतिष्ठित वर्गातील सभासदांसाठी या नियमांमधून सूट असे प्रकार केले जात त्यामुळे सर्वसामान्य लोकांना या पद्धतीमुळे कर्ज मिळविण्यात अडचणी येत.

८) कर्जाचा अयोग्य वापर :

सहकारी संस्थांकडून मिळालेल्या कर्जाचा वापर अनुत्पादक कारणांसाठी केला जात असे त्यामुळे शेतकऱ्यांकडून कर्जाची परतफेड केली जात नसे. परिणामी, सहकारी संस्थांच्या थकबाकीची व बुडीत कर्जाची समस्या वाढू लागली.

**ब) गोरवाला समितीने केलेल्या शिफारशी / सुचविलेल्या उपाययोजना :**

१) शासनाचा सहभाग :

सहकारी संस्था अधिक सक्षम करण्यासाठी सहकार संस्थांसाठी भांडवल उभारणी हा महत्त्वाचा घटक आहे. शासनाने सहकारी संस्थांच्या भागभांडवलात भागीदार होण्याची शिफारस या समितीने केली. राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अशा बँकांच्या भागभांडवलातील काही हिस्सा सरकारने द्यावा व त्यामार्फत सहकारी संस्थांना भांडवल पुरवठा करावा.

२) राष्ट्रीय कृषी पुरवठा निधी :

गोरवाला या समितीने अशी शिफारस केली की, रिझर्व्ह बँकेमार्फत मध्यम व दीर्घ मुदतीच्या राष्ट्रीय कृषी पुरवठा निधींची स्थापना करण्यात यावी त्यातून कृषी क्षेत्राची वित्तपुरवठ्याची गरज भागविता येईल

३) सहकारी प्रशिक्षण :

गोरवाला या समितीने सहकाराच्या प्रशिक्षणावर भर दिला. सहकारी संस्थांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना सहकाराचे प्रशिक्षण देण्यात यावे.

४) सहकारी संस्थांची पुनर्रचना व एकत्रीकरण :

लहान सहकारी संस्थांची अकार्यक्षमता लक्षात घेऊन या समितीने लहान सहकारी संस्थांचे एकत्रीकरण करून मोठ्या सहकारी संस्थांची स्थापना करण्याची शिफारस केली. या मोठ्या सहकारी संस्था अधिक कार्यक्षमतेने कार्य करू शकतील, असे या समितीचे मत होते.

५) पीक तारण कर्ज पद्धती :

गोरवाला या समितीने शेतकऱ्यांना कर्ज देताना हे शेतकरी उत्पादित करत असलेल्या पिकांच्या तारणावर कर्ज देण्याच्या पद्धतीचा अवलंब करण्याची शिफारस केली. पीक तारणामुळे शेतकऱ्यांना कर्जासाठी अन्य तारण देण्याची गरज राहणार नाही.

६) कामकाजावर देखरेख :

सहकारी संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, हिशेब तपासणी करणे यासाठी कार्यक्षम यंत्रणेच्या निर्मितीची शिफारस करण्यात आली.

## वैद्यनाथन समिती अहवाल 2005

### A) वैद्यनाथन समितीची स्थापना

भारत सरकारने 2004 साली रा. वैद्यनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. सहकारी पतपुरवठा संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी स्थापन केलेली ही संस्था होती. या समितीचे लक्ष्य होते ग्रामीण सहकारी पतसंरचनेचे पुनरुज्जीवन व पुनर्सक्षमीकरण.

### B) वैद्यनाथन समिती स्थापण्याचा उद्देश

१) विविध समित्यांनी या संदर्भात केलेल्या शिफारशी लक्षात घेऊन ग्रामीण सहकारी बँकिंग संस्थांच्या पुनरूज्जीवनासाठी एक योजना तयार करणे.
२) वरील कारणासाठी योग्य अशी नियामक चौकट सुचविणे तसेच त्या संदर्भात संबंधित कायद्यात आवश्यक असणाऱ्या सुधारणा सुचविणे.
३) अशा सहकारी संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी किती,कशाप्रकारे हे साहाय्य देण्यात यावे तसेच त्याचे स्वरूप कसे असावे आणि त्याचे टप्पे कसे असावेत याची आकारणी करणे.
४) ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्यक्षमता आणि स्थैर्य वाढविण्यासाठी योग्य ती उपाययोजना सुचविणे.

**C) वैद्यनाथन समितीने सुचविलेल्या शिफारशी**

वैद्यनाथन समितीने १९९९ च्या कपुर समिती, २००१ ची व्यास समिती व विखे पाटील समिती अशा समित्यांच्या अहवालांचा अभ्यास केला. तसेच एकंदरीत ग्रामीण सहकारी पतपुरवठा रचनेचा अभ्यास करून २००५ साली आपला अहवाल मांडला. या अहवालात वैद्यनाथन समितीने खालील शिफारशी केल्या.

१) वैद्यनाथन समितीने असे सुचविले की, सहकारी पतपुरवठा संस्था आणि बँका राज्य सरकारच्या नियंत्रणातून मुक्त कराव्यात आणि प्रत्येक राज्य आंध्र प्रदेश राज्यातील कायद्याप्रमाणे कायदे पारित करण्यात यावेत.

२) राज्य सरकारचा वैयक्तिक सहकारी संस्थांमधील भागभांडवलातील सहभाग कमी करावा.

३) ब्रह्म प्रकाश समितीच्या शिफारशी आणि आंध्र प्रदेशातील कायदा विचारात घेऊन या समितीने असे सुचविले की प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना त्यांच्या पतपुरवठा निर्णयांमध्ये स्वातंत्र्य देण्यात यावे.

४) सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची पुनर्रचना करण्यात यावी आणि त्यामध्ये राज्य सरकारने नामनिर्देशित केलेले सदस्य असू नयेत.

५) सहकारी बँकांमध्ये अर्हताप्राप्त कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. ही अर्हता रिझर्व्ह बँकेनी निश्चित करावी. बँकेतील कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्यात यावे.

६) सर्व पातळ्यांवरील कर्मचारी कॅडट प्रणाली संपुष्टात आणावी.

७) ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी आणि त्यांचे संचयित तोटे कमी करण्यासाठी विशिष्ट असे वित्तीय साहाय्य देण्यात यावे.

८) सहकारी पतपुरवठा संस्थांना लोकशाही, सदस्याभिमुख, स्वायत्त आणि स्वावलंबी बनविण्यासाठी संस्थात्मक पुनर्बांधणी करण्यात यावी.

९) बँकांच्या आदर्श अशा वित्तीय व्यवस्थापनासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेला सक्षम बनविण्यासाठी कायदेशीर नियामक चौकटीत आमूलाग्र बदल करण्यात यावेत.

१०) अस्तित्वात असणाऱ्या कायद्यांमध्ये योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात जेणेकरून प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना त्यांच्या जिल्ह्याबाहेरील सहकारी बँकांकडून कर्ज घेता येईल.

११) राज्य पातळीवर एक विशेष पथकाची स्थापना करण्यात यावी जेणेकरून स्थानिक पातळीवरील संस्थांचा पतप्रवाह सुरळीत राखता येईल.

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकास

## A)प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याची अधिकृतपणे स्थापना १ मे, १९६० रोजी झाली. राज्याच्या स्थापनेआधीच महाराष्ट्रात सहकारी चळवळीस सुरुवात झाली होती. ग्रामीण व शहरी भागात शेती, बँकिंग, उद्योग अशा विविध क्षेत्रात या चळवळीचा प्रसार झाला. विठ्ठलराव विखे पाटील, बॅ. धनंजयराव गाडगीळ अशा द्रष्ट्या नेत्यांमुळे सहकारी चळवळीस चालना मिळाली. सहकारी साखर कारखाने, कृषी पतपुरवठा संस्था, सहकारी बैंकिंग या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली गेली.

## B)राज्यशासनाचा सहभाग

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर ९ मे १९६१ रोजी सहकारी क्षेत्रासाठी स्वतंत्र कायदा मंजूर करण्यात आला. हा कायदा सहकारी संस्थांचा कायदा, १९६० या नावाने ओळखला जातो. राज्यातील सहकारी क्षेत्राचे नियंत्रण व नियमन या कायद्यानुसार केले जाते. राज्याच्या सहकार क्षेत्राच्या विकासात या कायद्याचे महत्त्वाचे योगदान आहे. या कायद्यात एकूण १६७ कलमे आहेत. महाराष्ट्रामध्ये शासनाचे स्वतंत्र सहकार खाते कार्यरत असून या खात्यामार्फत सहकारी चळवळीच्या विकासासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबविले जातात.सहकार क्षेत्रात महाराष्ट्र राज्याचा नावलौकीक आहे.

## C)विविध सहकारी संस्थांचा विकास

महाराष्ट्रात शहरी व ग्रामीण भागात सहकारी चळवळीचा चांगला प्रसार झाला असून विविध क्षेत्रात अनेक सहकारी संस्था कार्यरत आहेत. शहरी भागात औद्योगिक सहकारी संस्था, नागरी सहकारी बँका, ग्राहक भंडारे, पतपेढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. सन २००१ पर्यंत औद्योगिक सहकारी संस्थांची संख्या ३६,*000* पेक्षा जास्त होती. येथे ग्राहक भांडारांचीही संख्या लक्षणीय आहे. सन २००१ मध्ये कृषी पतसंस्थांची संख्या २०,*000* पेक्षा जास्त होती. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सहकारी चळवळीची पाळेमुळे खोलवर रुजली असून ही चळवळ ग्रामीण भागाच्या विशेषतः ग्रामीण दुर्बल घटकांच्या विकासात साहाय्यक ठरत आहे.

## भारतातील सहकारी चळवळीची सद्यस्थिती
## (Current scenario of Co-operative Movement in India)

1) सहकारी बँकाची सद्यस्थिती

भारतामध्ये मार्च २०१७ पर्यंत सहकारी बँकांची सद्यस्थिती पाहता त्यावेळी एकूण सहकारी पतसंस्थेची संख्या ९५९४६ इतकी होती. यामध्ये शहरी सहकारी पतसंस्था , ग्रामीण सहकारी पतसंस्था , सूचित -अनुसूचित पतसंस्था तसेच अल्प -दीर्घ  कालावधी च्या संस्था  मग यामध्ये राज्य सहकारी बँक आणि जिल्हा सहकारी बँक या सर्व बँकांचा समावेश या आकडेवारी मध्ये आहे.

2) सहकार चळचळीत सुधारणा करण्यासाठी नेमलेल्या समित्या, कायदे व सुधारणा

बदलत्या काळानुसार सहकार चळवळीतील दोष कमी करुन सहकार चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या. याशिवाय सहकार चळवळीचा आढावा घेऊन फेररचना करण्यासाठी विविध समित्यांची नियुक्तीकरुन सुधारणा करण्यात आल्या.

3) योजनाकाळात सहकार क्षेत्रासाठी केलेली तरतुद व घेतलेले निर्णय

भारताचा नियोजनबध्द विकास करण्यासाठी भारत सरकारने १९५० मध्ये नियोजन आयोगाची स्थापना करुन पाच वर्षाची एक योजन याप्रमाणे कालावधी निश्चित केला व प्रत्यक्षात १९५१ पासुन पहिली पंचवार्षिक योजना राबवुन सुरुवात करण्यात आली. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सहकार चळवळ मजबुत करण्यासाठी काही ठोस निर्णय घेतले व भरीव आर्थिक तरतुद केली.

४) सहकार कायद्यातील ९७ वी घटना दुरुस्ती :

अलीकडील काळातील सहकार क्षेत्रातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे सहकार कायद्यातील ९७ वी घटना दुरुस्ती होय. भारतात सहकार क्षेत्राची रचना निश्चित करण्यासाठी वेळोवेळी कायदे करण्यात आले. तसेच अनेक अभ्यास समित्या नेमण्यात आल्या. मात्र सहकार क्षेत्रास भारताच्या राज्यघटनेत स्थान देण्यात आलेले नव्हते. ब्रह्मप्रकाश चौधरी समितीने सुचविलेला मॉडेल कायदा (१९९०), राष्ट्रीय सहकार धोरण (२००२) व शिवाजीराव पाटील समितीच्या (२००९) शिफारसी यांचा एकत्रित परिणाम म्हणुन घटना दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला.

5) भारतातील राज्य निहाय प्राथमिक सहकारी पतसंस्थांची सद्यस्थिती

२०१४-१५च्या आकडेवारीवरुन भारतात प्राथमिक सहकारी पतसंस्थांची संख्या ९२,७८९ होती. भारतातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांशी तुलना केल्यास महाराष्ट्रात सहकार चळवळ सर्वाधिक विकसित असल्याचे स्पष्ट होते. एकट्या महाराष्ट्राचा भारतातील वाटा विचारात घेतल्यास सहकारी पतसंस्थांची संख्या २२.८४%, सभासद संख्या ११.५०%, कार्यकारी भांडवल ६.८०%, जमा ठेवी ०.२२% (रु. १,८७७ दशलक्ष), तर २०१३-१४ या वर्षात महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्थांनी एकुण कर्जवाटप केलेली रक्कम ७.९२% (रु. १,२६,१२६ दशलक्ष) इतकी होती.

**घटनादुरुस्तीत सुचविलेले बदल**

1) भाग तीन मधील किंवा संघ या शब्दानंतर सहकारी संस्था हा शब्द समाविष्ठ करण्यात आला.

2)भाग चारमध्ये कलम ४३ ब चा नव्याने समावेश करण्यात आला. या कलमामुळे सहकारी संस्थांची ऐच्छिक निर्मिती, स्वायत कार्यपध्दती, लोकशाही नियंत्रण आणि व्यावसायिक व्यवस्थापन यास चालना देण्यासाठी राय प्रयत्न करेल.

३) भाग ९ अ नंतर भाग ९ ब समाविष्ठ करण्यात आला. यात पुढील तरतुदीचा समावेश करण्यात आला.

अ) सहकारी संस्थाची निर्मिती करणे हा मुलभुत हक्क असेल.

ब) संचालक मंडळात एक जागा अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमातींसाठी आणि दोन जागा महिलांसाठी राखीव असतील.

क) सहकारी संस्था निवडणुकांचे पर्यवेक्षण करण्यासाठी यंत्रणा स्थापन करु शकते.

ड) संचालक मंडळाच्या कालावधीत सारखेपणा असेल.

इ) संचालक मंडळात जास्तीत जास्त २१ सदस्य असतील. संचालक मंडळातील सदस्यांचा कार्यकाल निवडणुक झाल्यापासुन पाच वर्षे एवढा राहील.

फ) संचालक मंडळ हे किमान सहा महिन्याच्या कालावधीसाठी निलंबीत ठेवले जाऊ शकते.

उ) स्वतंत्र व्यावसायिक लेखापरिक्षण केले जावे.

ऊ) सहकारी संस्थांच्या सदस्यांना माहितीचा अधिकार उपलब्ध करुन दिला जाईल.

ज) सहकारी संस्थांच्या क्रिया व हिशोब या विषयीचा नियतकालीन अहवाल तयार करण्याचा राय सरकारला अधिकार असेल.

छ) सहकारी संस्थांबाबतचे गुन्हे आणि दंड याबाबतची तरतुद केली जाईल.

--------------------------------The End----------------------------------------

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ.धीरज झाल्टे व इतर, सहकारः सिद्धांत आणि कार्यपद्धती(२०२०), प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.

२) प्रा.नंदा लहाडे, सहकार (२०१३), आयडॉल पब्लिकेशन, पुणे.

३) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास क्रम संशोधन मंडळ ,पुणे  : सहकार

४) तापकीर मुकुंद व साबळे आर.जे. (२००५), सहकार ,निराली प्रकाशन ,पुणे

५) डॉ. आर के दातीर (२००९) ‘भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार , निराली प्रकाशन,पुणे

६) जोशी सी जे (१९८६ ), सहकार , फडके प्रकाशन, कोल्हापूर